# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-४४०** **दिनांकः २५/१२/२०२३**

**“अपहृत बालकांना बॉम्बने उडवून देऊ” अशी धमकी देऊन १० लाखांची खंडणी मागणाऱ्या अपहरणकर्त्या खंडणीखोरांना अटक करण्यास नायगाव पोलीसांना यश.**

दिनांक २३/१२/२०२३ रोजी अज्ञात इसमांनी फिर्यादी दिपककुमार हरीवंश गुप्ता यांना फोन करुन “तेरी लडकी और लडके का किडनॅप किया हुँ। बच्चोंके पेटपे बंम्ब बांधके रखा हुँ, रिमोट मेरे हाथ मे है, एक मिनीटमे जान से मारडालुंगा। अगर उनकी सलामती चाहते हो, तो तुम १० लाख रुपये जहा अॅड्रेस बताउंगा वहा लेके आ जाना तुम्हारे बच्चे बच्ची दोनो बच जाएंगे।” असे बोलुन अपहृत बालकांचा आवाज ऐकवला.

फिर्यादी दिपककुमार हरीवंश गुप्ता यांनी त्यांची मुलगी वय १७ वर्षे व मुलगा वय ०८ वर्षे यांचे अपहरण झाले बाबत नायगांव पोलीस ठाणे येथे दिनांक २३/१२/२०२३ रोजी रात्रौ २०:०० वा. च्या सुमारास माहिती दिली.

सदर प्रकाराचे गांर्भीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांनी तात्काळ तीन शोध पथके तयार केले. तिनही पथकांना अपहृत बालकांचा शोध घेणेस तात्काळ रवाना केले. तांत्रीक तपास व गोपीनय खबरी यांचे आधारे अपहृत बालकांचा शोध घेत असतांना अपहृत बालकांना मिनाक्षी नगर, काशिगांव येथील एका खोलीत डांबुन ठेवण्यात आल्याचे निष्पन्न झाले. नायगांव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने समयसुचकता दाखवीत शिताफीने अपहृत बालकांची दिनांक २३/१२/२०२३ रोजी रात्रौ २२:०० वा. सुटका केली.

अपहृत बालकांना मिनाक्षी नगर, काशिगांव येथील एका खोलीत डांबुन ठेवुन अपहरणकर्ते स्वतःचा ठावठिकाणा लपवून फिर्यादी यांचे कडे १० लाख रुपयांच्या खंडणीची रक्कम मागत होते. सदरची खंडणीची रक्कम मागणे करीता अपहरणकर्ते विविध मोबाईल क्रमांकांचा वापर करत होते. अपहरणकर्त्यांच्या ठावठिकाण्याची माहिती नायगांव पोलीसांनी प्राप्त करुन वाकीपाडा येथील पथकास दिली.

अपहरणकर्त्यांना पकडणे करीता नायगांव पोलीसांनी वेशभुषा बदलुन मधुबन वसई पुर्व येथे ठिकठिकाणी सापळा लावून अपहरणकर्त्यांचा शोध घतला. सदर अपहरणकर्त्यांना ताब्यात घेत असतांना त्यांनी पळुन जाण्याचा प्रयत्न केला परंतू पोलीसांनी शिताफीने त्यांना ताब्यात घेऊन अटक केले. अपहरणकर्त्यांना ताब्यात घेत असतांना अपकरणकर्ते तसेच पोलीस अंमलदार अशोक पाटील हे किरकोळ जखमी झाले. अपहरणकर्त्यांना दिनांक २४/१२/२०२३ रोजी ०१:०० वा. चे सुमारास ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणला.

सदरचा गुन्हयाची नायगांव पोलीस ठाणे येथे खबर मिळाल्यानंतर ०२ तासात अपहृत बालकांची सुखरूप सुटका करुन, ०५ तासात अपहरणकर्त्या खंडणीखोरांना अटक करण्यास नायगाव पोलीसांना यश आले आहे.

फिर्यादी दिपककुमार हरीवंश गुप्ता यांनी नायगांव पोलीस ठाणे येथे दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि. क्र. ४५५/२०२३ भा.दं.वि.स. कलम ३६३,३६४(अ),३८७,३४२,१२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपहरणकर्ते जयप्रकाश ऊर्फ सोनु गंगाराम गुप्ता वय २३ वर्षे रा.काशीगांव मिरारोड व विपुल शशीकांत तिवारी वय २० वर्षे रा. काशीगांव मिरारोड यांची मा. न्यायालयाने दिनांक २९/१२/२०२३ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजूर केलेली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/विनोद वाघ हे करीत आहेत.

वरील कामगीरी श्रीमती पौणिमा चौगुले-श्रींगी पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२, वसई, श्रीमती. पदमजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रमेश भामे, पो.नि.मंगेश अंधारे (प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, सपोनि/रोशन देवरे, गणेश केकाण, बलराम पालकर, पोउपनि/विष्णु वाघमोडे, सुरज जगताप, पोहवा/सुनिल पाटील, नितीन मरगजे, भालचंद्र बागुल, देविदास पाटील पो.अंम. अमोल बर्डे, सचिन खताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.